श्री.

आषाढ वा १० गुरुवार शके १७१५

पा राजश्री गोविंदराव स्वामींचे सेवेसी.

विनंति. उपरि निर्मळ वगैरे माहालाबावत स्वराज्याच्या यैवजाच्या तनखा औरंगाबादचे सुभ्यावर पेशजी घेतल्या. त्यापैकीं वसूल सरकारांत पावला; व बाकी येणें त्याची याद तुह्मीं पाठविली त्याप्रों मध्यस्तासी बोलण्यांत आलें. यांजकडे अहसनुदौला व कृपावंत यांनीं वसूल पावल्याचें पत्र व रसीदाच्या नकला पाठविल्या. त्यासी व आपले यादीसी मुकाबिला करून येकंदर याद ठरविली ती पा आहे. त्यावरून ता कळेल. रा छ. २३ जिल्हेज हे विनंति.

श्री.

आषाढ वा १० गुरुवार शके १७१५.

यादी — जाबीतजंग मरहुम यांजबाबत माहालचे स्वराज्याचा यैवज नवाबाचे सरकारांतून ता सन १२०१ व सन १२०२ पौ आलल हिसेबी याच्या तनखा अहसनुदौला व कृपावंत यांचे नांवें जाल्या होत्या.

रुपये

४७३९९१॥॥

पौ वसूल बमोजीबफर्द मोहरी अहसनुदौला बाहदुर व कृपावंत ता रजब सन १२०१ हिजरी. १९१२००॥-। रुपये.

ता

१३४३०४॥≈ वा रसीदाच्या नकला.

५६३०४॥≈ रसीद बापूजी रामचंद्र व लक्ष्मण तुकदेव निा गोविंद कृष्ण गोडबोले मु कोपरगांव छ १३ रमजान सन १२०२ फसली.

५००० रसीद सखोजीबाजी कारकून निा सरकार छ. १५ रमजान सन १२०२ फसली.

७३००० रसीदा चिंतामण हरि.

५०००० छ. ६ शवालची रसीद ?

२३००० छ. ५ मोहरमचें पत्र.३०१९२॥=।.

पौ यैवज पटला नाहीं. यैसें पत्रांत सबब मजुरा दिल्हे नाहींत. ७१९२॥=। बाकी रुपये.

७३०००

१३४३०४॥=

१६८९५॥॥। तनखादारास वसूल दिल्हा ह्मणोन अहसनुदौला व कृपावंत यांनीं नवाबास लिहिलें. परंतु सदरहूची रसीद नाहीं. सबब यैवज मजुरा होणार नाहीं. येसें आमचें बोलणें. यावरून मध्यस्तांनीं आपलें पारसी पत्र अहसनुदौलास दिल्हें कीं सदरहू सोळा हजार आठसें पंच्याणव रुपये, सवा चौदा आणे तनखादारास दिल्हे असल्यास रसीद पाठवावी. दिल्हे नसल्यास सदरहू यैवज यावा. याप्रों पत्र दिल्हें सबब वसुलीं घातले.

१५१२००॥।

यास ता॥ ———— रुपये

९४०९८।= हा याद रुजु दफ्तर सरकार पुणियांहून आली.

५६३०४॥= कोंपरगांवची वरात ९५००० पौं.

५००० सखो जिवाजी.

१४७९३॥ पोत्यास आले.

१८००० कुराणाकडील वरात जाली त्यास पावले.

९४०९८।=.

१७१०२।=।. ज्याजती वसूल.

४०२०६॥ ह्या रसीदा चिंतामण हरि.

१०००० किा रसीद.

२३००० किा रसीद.

---

७३०००

पौ पुणियाहून याद आली त्यांत.

१४७९३॥. पोत्यास आले.

१८००० कुरणाकडील वराती ह्या.

---

३२७९३॥.

बाकी ज्याजती.

११८९१॥।=।. तनखादारास वसूल पावला येसें सुभेदारांनीं लिहिलें येविषयीं मध्यस्ताचें पत्र पो तें.

---

१७१०२।=।.

---

१९१२००॥।-।.

बाकी———————— ————रुपये.

३२२७९०॥।≡।.

तपसील.

१०२००० जमधन साहू याचे दुकानीहून पटणचे स्वारींत मध्यस्ताचे विद्यमानें सवातीन लक्ष रुपये कर्ज सरकारांत राजश्री हरिपंत तात्या यांनीं घेतलें त्या पैवजीं.

१००००० रदकर्ज सवा तीन लाखाचे रोख्यामागें वसूल घातला.

२००० सदरहू लाख रुपये औरंगाबादीं देणें त्याचे हुंडावणी बाबत.

१०२०००

३२०७९०॥ ≈। हुंडी चिठी औरंगाबादेवर जगधन साहू याचे दुकानीं नगदी ई॥ छ २० माहे जिल्हेज पासोन दोन महिन्याचे मुदतीनें छ २० सफरी द्यावे याप्रों.

३२३७९०॥ ≈।.

तीन लक्ष तेवीस हजार सातसें नव्वद रुपये सवा पंधरा आणे बाकी तनख्याबमोजीब त्याचा फडच्या सदरीं लिहिल्याप्रों छ २३ जिल्हेज मु॥ बेदर अत्रों लिसईन.

## श्री.

आषाढ व॥ १० गुरुवार शके १७१५.

पु॥ राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेसी.

विनंति. उपरि तनखाचे यैवज पौ सरकारांत वसूल औरंगाबादचे सुभ्याकडून पावला याचा मुकाबिला पुण्याहून याद आली त्यासी व यांजकडील तेथून सुभ्याचें पत्र व रसीदांसी कारितां कोंपरगांवची वरात व सखो जिवाजी येकूण दोन रकमांचा ताळा यादीसी व रसीदांसी नीट पडला यासिवाय राजश्री दाजीबा यांच्या दोन रसीदा येक पंनास हजारांची व दुसरें पत्र तीस हजार येकसें ब्याणव रुपये सवा पंधरा आण्याचें पैकीं तेवीस हजार यैवज पटला ह्मणोन पत्रांत लेख येकूण त्र्याहातर हजार रुपये पत्राप्रमाणें यैवज वसूल लिहिला. व यापौ पोत्यास दाखल व कुरणाकडील वरातेबाबत यैवज पुण्याचें यादींत बतीस हजार सातसें साडे त्र्याणव रुपये हा रकमा यांचे हिसेबीं आलाहिदा नाहींत. त्या पक्षीं त्र्याहातर हजारांत असतील. सबब वजा जातां चाळीस हजार दोनसें साडेसहा रुपये पुण्याकडील यादीसिवाय